## नि.दि.मु.क्र.१५/२०१६ मधील निशाणी क्र. ८३ वरील आदेश
## (CNRNo.MHSI090000432016)

०१. अर्ज व त्यावरील प्रतिवादींचा जबाब वाचला. उभय पक्षांच्या विद्वान विधिज्ञांचा युक्तिवाद श्रवण केला.

०२. प्रस्तूतच्या अर्जान्वये वादी यांनी मयत प्रतिवादी क्र.१९ कृष्णा, क्र.२८ नामदेव व क्र.२९ राजेंद्र मासये यांचे कायदेशीर वारस दाखल करण्यास झाला विलंब माफ करुन वारस दाखल करणेस परवानगी मिळणेबाबत विनंती केली आहे.

०३. अर्ज व त्यावरील जबाब तसेच, उभय पक्षाच्या विद्वान विधिज्ञांचा युक्तिवाद लक्षात घेऊन संचिकेचे अवलोकन केले असता, प्रतिवादी क्र.१९ कृष्णा, क्र.२८ नामदेव व क्र.२९ राजेंद्र मासये हे अनुक्रमे दि.०६/०१/२०२१, दि.१४/०९/२०२१ व दि.१६/०३/२०१७ रोजी मयत झाल्याचे दिसून येते. परीणामी, दाव्याचे स्वरुप व मागील कोरोना महामारी व ताळेबंद परीस्थिती लक्षात घेता, प्रस्तुतचा अर्ज खर्चासह मंजूर होणेस पात्र आहे. करीता, खालील प्रमाणे आदेश पारित करत आहेः

**– आदेश –**

०१. निशाणी क्र.८३ वरील अर्ज मंजूर करण्यात येत आहे.
०२. वादींनी खर्च म्हणुन रु.२००/-(रूपये दोनशे फक्त) प्रतिवादींना द्यावे.
०३. विहीत मुदतीत आदेशाची पुर्तता न केल्यास आदेश आपोआप रद्द झाल्याचे समजावे.

Digitally signed by SUNIL BABASAHEB WALKE
Date: 2022.07.07 11:19:15 +0530

स्थळ : देवगड (एस.बी.वाळके)
दिनांक : ०६/०७/२०२२ दिवाणी न्यायाधीश क.स्तर देवगड.